# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

०१ जानेवारी,२०१९


☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
✍: 7276494810 (PRO)


## चंद्रपूर पोलीसांची अवैध दारूविक्री करणाऱ्यांवर कार्यवाही

जिल्हयात दारूबंदी घोषीत झाल्यापासुन अवैध दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्यांवर चंद्रपूर जिल्हा पोलीस प्रभावी कार्यवाही करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहे. यादरम्यान दिनांक ३१/१२/२०१८ रोजी जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत नाकेबंदी आणि छापे टाकुन अवैध दारूचा साठा जप्त करण्यात पोलीसांना यश प्राप्त झाले आहे.

यामध्ये जिल्हयातील पोलीस स्टेशन **रामनगर, बल्लारशाह, घुग्घुस, ब्रम्हपुरी, चिमुर, भिसी, तळोधी, शेंगाव, माजरी, सावली, सिंदेवाही, राजुरा, गोंडपिंपरी, विरूर** अंतर्गत संबधीत पोलीस पथकाने प्रभावी कार्यवाही करीत दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्याच्या विरूध्द जिल्हयात एकुण ४० गुन्हयाची नोंद करण्यात आली आहे. सदर गुन्हयातील १५ आरोपीस अटक करण्यात आले असुन एकुण **२९,७५,८००/—रू.** चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. पुढिल तपास संबंधीत पोलीस स्टेशन करीत आहे.

---

## चंद्रपूर पोलीसांची जुगार खेळणाऱ्यांवर कार्यवाही

### १) पोलीस स्टेशन दुर्गापुर :—

दिनांक **३१/१२/२०१८** रोजी पोलीस स्टेशन **दुर्गापुर** अंतर्गत ०१ आरोपी ईसम हा सट्टापटट्रीच्या आकडयावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगाराचा खेळ खेळताना मिळुन आल्याने पो.स्टे. **दुर्गापुर** येथे अप. क्र. **५११/२०१८** कलम १२ (अ) मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील ०१ आरोपीस अटक करण्यात आले असुन घटनास्थळावरून जुगारच्या साहीत्यसह नगदी असा एकुण **१,०१०/—रू.** चा माल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास **दुर्गापुर** पोलीस करीत आहे.

---